सकाळ
औरंगाबाद, गुरुवार, ५ जुलै २०१८
४
लातूर TODAY सकाळ
www.esakal.com / SakalNews / www.agrowon.com / www.sakaltimes

# स्वित्झर्लंडच्या मॅरेथॉनमध्ये ओमकारचे नेत्रदीपक यश

## साकोळच्या धावपटूने मिळवले कांस्यपदक, 'स्टार ऑफ स्विस'ने सन्मानित



ओमकार स्वामी

**साकोळ, ता. ४ (बातमीदार) :** दहावीमध्ये नापास झाल्यानंतरही या अपयशाला झुगारून साकोळचा धावपटू ओमकार स्वामीने इतिहास रचत स्वित्झर्लंडमध्ये झालेल्या महामॅरेथॉन स्पर्धेत कांस्यपदकावर आपले नाव कोरले आहे.

स्वित्झर्लंड येथील झर्मत या शहरांमध्ये तीन जुलैरोजी पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय महामॅरेथॉन स्पर्धेत ओमकारने तिसरा क्रमांक पटकावला आहे. या स्पर्धेसाठी महाराष्ट्रातून ओमकारची निवड करण्यात आली होती. १०० कि.मी. धावण्याचे अंतर ओमकारने नऊ तास दोन मिनिटांत पूर्ण केले. या स्पर्धेत केनियाच्या विल्सन किपसंग या धावपटूने हे अंतर आठ तास १० मिनिटांमध्ये पूर्ण करून सुवर्णपदक मिळवले, तर दुसराही क्रमांक केनियाच्याच डेनिस किमटो या धावपटूने आठ तास ४० मिनिटांत पूर्ण करीत रजत पदक मिळविले. ओमकारने कांस्यपदक पटकावत भारताची मान परदेशातही उंचावली आहे.

ओमकारने स्पर्धेला जाण्यापूर्वीच या स्पर्धेत यश मिळवणारच असा विश्वास व्यक्त केला होता. त्याने आपला शब्द राखत यश मिळवण्याचे स्वप्न साकारले आहे. ओमकारने धावण्याचे तंत्रशुद्ध प्रशिक्षण पंजाबमधील पटियाला येथील सुभाष नॅशनल अॅकॅडमी येथे घेतले आहे. ओमकारने यापूर्वीही भारतातील स्पर्धांमध्ये अनेक पारितोषिके मिळविली आहेत. त्यात औरंगाबाद येथे झालेल्या २१ किलोमीटर मॅरेथॉन स्पर्धेत पहिल्या पाचमध्ये स्थान मिळवले होते. २०१७ मध्ये चेन्नई येथे झालेल्या चेन्नई चॅंपियनशिप मॅरेथॉनमध्ये पहिला क्रमांक प्राप्त केला होता. त्यामुळे त्याला चेन्नई स्पोर्ट असोशियशनतर्फे बेस्ट रनर पुरस्कार मिळाला होता. सिमला येथे झालेल्या २१ किलोमीटर मॅरेथॉनमध्ये दुसरा क्रमांक पटकावला होता, तर मुंबई येथे झालेल्या टाटा मॅरेथॉनमध्ये पहिल्या दहामध्ये तो आला होता. त्याने मिळवलेल्या कांस्यपदकामुळे स्पर्धेच्या आयोजकाकडून ओमकारचा 'स्टार ऑफ स्विस' हा सन्मान देऊन गौरविण्यात आले. ओमकारने मिळवलेल्या या नेत्रदीपक यशाबद्दल त्याचे अभिनंदन केले जात आहे.

एकमत

# काळेची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड



**शिरूर अनंतपाळ :** तालुक्यातील उत्कृष्ट कुस्तीपट्टू असलेल्या गणेश काळे याची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून त्याच्या या निवडीचे सर्व स्तरातून स्वागत केले जात आहे.

शहरातील शिवनेरी महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्षात शिकत असलेल्या गणेश सुभाष काळे या विद्यार्थ्याची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठ संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी ८६ किलो वजन गट ' फ्रीस्टाईल ' या क्रीडा प्रकारात निवड झाली आहे. ही स्पर्धा दि. १४ ते १८ नोव्हेंबर १९ दरम्यान गुरू जांभेश्वर विद्यापीठ हिसार हरियाना येथे होणार आहे.त्याच्या या निवडीबद्दल संस्थाध्यक्ष अॅड. विश्वभंरराव माने,सचिव पदमाकर मोगरगे, सहसचिव प्रताप माने कोषाध्यक्ष जयेश माने, अॅड ' सुतेज माने, प्राचार्य डॉ ए.एन. पवार उपप्राचार्य डॉ.नारायण सुर्यवंशी क्रीडा संचालक प्रा. बालाजी हालसे , महाविद्यालयातील प्राध्यापक शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थ्यांनी काळे यांचे अभिनंदन केले.

सामना क्रीडा

रविवार, दि. १७ नोव्हेंबर २०१९

# शिवनेरी महाविद्यालयाच्या खेळाडूंची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

शिरुर अनंतपाळ, दि. १६ (सा.वा.) – येथील शिवनेरी महाविद्यालयातील बी.ए. प्रथम वर्षात शिकत असलेला विद्यार्थी गणेश सुभाष काळे याची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठ संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी ८६ किलो वजन गट फ्रीस्टाईल या क्रीडा प्रकारात निवड झाली आहे.

या स्पर्धेला १४ नोव्हेंबर रोजी सुरुवात झाली असून, १८ नोव्हेंबरपर्यंत गुरू जांभेश्वर विद्यापीठ हिसार (हरियाणा) येथे होणार आहेत. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. विश्वंभराव माने, सचिव पद्माकर मोगरगे, सहसचिव प्रताप माने, कोषाध्यक्ष तथ सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती जयेश माने, संस्थेचे संचालक ॲड. सुतेज माने, प्राचार्य डॉ.ए.एन. पवार, उपप्राचार्य एन.बी. सूर्यवंशी, क्रीडा संचालक प्रा. बालाजी हालसे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

शिवनेरी महाविद्यालयाच्या खेळाडूंची राष्ट्रीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड

शिरुर अनंतपाळ, दि. १६ (सा.वा.) – येथील शिवनेरी महाविद्यालयातील बी.ए. प्रथम वर्षात शिकत असलेला विद्यार्थी गणेश सुभाष काळे याची स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ नांदेडच्या विद्यापीठ संघात राष्ट्रीय स्पर्धेसाठी ८६ किलो वजन गट फ्रीस्टाईल या क्रीडा प्रकारात निवड झाली आहे.

या स्पर्धेला १४ नोव्हेंबर रोजी सुरुवात झाली असून, १८ नोव्हेंबरपर्यंत गुरू जांभेश्वर विद्यापीठ हिसार (हरियाणा) येथे होणार आहेत. याबद्दल संस्थेचे अध्यक्ष ॲड. विश्वंभराव माने, सचिव पद्माकर मोगरगे, सहसचिव प्रताप माने, कोषाध्यक्ष तथ सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती जयेश माने, संस्थेचे संचालक ॲड. सुतेज माने, प्राचार्य डॉ.ए.एन. पवार, उपप्राचार्य एन.बी. सूर्यवंशी, क्रीडा संचालक प्रा. बालाजी हालसे व महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांनी अभिनंदन केले व पुढील स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

पुण्य नगरी
रविवार, १३ ऑगस्ट २०१७ । लातूर

# आंतरमहाविद्यालयीन व्हॉलिबॉल स्पर्धेत शिवनेरी महाविद्यालय प्रथम

**शिरुर अनंतपाळ / प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या वतीने 'अ' गटातील आंतरमहाविद्यालयीन पुरुष व महिला व्हॉलिबॉल स्पर्धा ११ व १२ ऑगस्ट २०१७ रोजी पार पडल्या. या स्पर्धेत अ विभागातून १२ पुरुष व ५ महिला संघांनी सहभाग नोंदवला. पुरुष विभागातून शिरुर अनंतपाळच्या शिवनेरी महाविद्यालयाने सर्वप्रथम, औराद शहाजानीच्या मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाने द्वितीय तर लातूरच्या जयक्रांती महाविद्यालयाने तृतीय क्रमांक मिळवला. महिला संघातून लातूरचे शाहू महाविद्यालय प्रथम क्रमांक, लातूरचे महात्मा बसवेश्वर महाविद्यालय द्वितीय तर लातूरचेच जयक्रांती महाविद्यालय तृतीय आले.

स्पर्धेचे बक्षीस वितरण अॅड. विश्वंभर माने यांच्या हस्ते झाले. यावेळी प्राचार्य बी.जी. सोनवणे, चेअरमन नल्लाभास्कर रेड्डी, डॉ. महेश बेंबडे, डॉ. अशोक वाघमारे, मधुकर क्षीरसागर, राष्ट्रीय खेळाडू विक्रम पाटील, दीपक पाटील, स्पर्धा संयोजक प्रा. बालाजी हालसे, डॉ. हणमंत वागलगावे उपस्थित होते. या स्पर्धेचा आनंद तालुक्यातील विद्यार्थी, खेळाडू यांनी घेतला.

विद्यापीठाने शिरुर अनंतपाळसारख्या ग्रामीण भागात या दोन दिवसांच्या स्पर्धा घेतल्याने तालुक्यात व्हॉलिबॉल खेळाला पोषक वातवरण झाल्याचे दिसून आले.

प्राचार्य
शिवनेरी कला,वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय
शिरुर अनंतपाळ,जि.लातूर-४१३५४४

पुण्य नगरी
सोमवार, ११ सप्टेंबर २०१७ । लातूर

# शिवनेरी महाविद्यालयाला कुस्ती स्पर्धेत उपविजेतेपद

**शिरुर अनंतपाळ / प्रतिनिधी**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेडच्या वतीने 'अ' विभागातील कुस्ती स्पर्धा महात्मा बस्वेश्वर महाविद्यालयात पार पडल्या. त्यात शिवनेरी महाविद्यालयाच्या सहा मल्लांनी उत्कृष्ट कामगिरी करुन सर्वसाधारण उपविजेते पद मिळविले.



७० किलो वजन गटात अमृत बिराजदार, ७४ किलो वजन गटात विष्णू तातपुरे, ९७ किलो वजन गटात विशाल गंभिरे प्रथम आले. तर ६१ किलो गटात भोईवार यशवंत, ६५ किलोगटात मुकदम आमर, ८६ किलो गटात शेख महमंद द्वितीय आले.

विजेत्या खेळाडूंना ट्राफी देऊन सन्मानित करण्यात आले. या खेळाडूंचे संस्थाध्यक्ष अॅड. विश्वांभर माने, तुकाराम माडे, पद्माकर मोगरगे, जयेश माने, प्राचार्य डॉ. बी. जी. सोनवणे, क्रीडाविभाग प्रमुख प्रा. बालाजी हालसे आदींनी अभिनंदन केले.






**Sports activities organized by college**






**Sports activities organized by college**






**Chess Competition organized by College**